विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड च्या पदांची सरळसेवा, पदोन्नती व प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात नियुक्ती प्राधिकारी घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक : आस्थाप्र-२०१८/प्र.क्र.२३/आस्था-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २३ फेब्रुवारी, २०१८.

<u>वाचा</u> : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२९०/कार्या.१२, दि.१९.११.२०१६.

<u>प्रस्तावना :</u>

गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांच्या तसेच गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने वा नेमणुका/पदस्थापना करताना संबंधित प्रकरणी कोणत्या स्तरावर अंतिम निर्णय घ्यावेत या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने दि.१९.११.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियुक्ती प्राधिकारी घोषित केले आहेत. तसेच गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड मधील पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका/पदस्थापनेच्या प्रकरणांवर अंतिम नियुक्ती प्राधिकारी कोण असतील या संदर्भात संबंधित प्रशासकीय विभागांनी पदनिहाय नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे पदनाम स्वतंत्र आदेशान्वये घोषित करण्याबाबत कळविले आहे. या अनुषंगाने विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व इतर मागास प्रवर्ग कल्याण विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड च्या पदांवरील सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :

मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील गट-ब (अराजपत्रित), गट-क मधील वाहनचालक वगळता इतर सर्व पदांसाठी नियुक्ती प्राधिकारी हा सामान्य प्रशासन विभाग आहे त्यामुळे विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व इतर मागास प्रवर्ग कल्याण विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क मधील वाहनचालक वगळता इतर सर्व पदांसाठी नियुक्ती प्राधिकारी हा सामान्य प्रशासन विभाग असेल.

२. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व इतर मागास प्रवर्ग कल्याण विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-क मधील वाहनचालक व गट-ड च्या पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास सक्षम असणारे प्राधिकारी पुढीलप्रमाणे घोषित करण्यात येत आहेत.

अ.क्र.	पदे	नियुक्ती प्राधिकारी
१	विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व इतर मागास प्रवर्ग कल्याण विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील वेतनश्रेणी ५२००-२०२००+ग्रेड पे १९०० या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीतील वाहनचालक या पदावर सरळसेवेने करावयाच्या नेमणुका/पदस्थापनेची प्रकरणे.	अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव
२	विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व इतर मागास प्रवर्ग कल्याण विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील वेतनश्रेणी ४४००-७४४०+ग्रेड पे १३०० या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीतील शिपाई या पदावर सरळसेवेने करावयाच्या नेमणुका/ पदस्थापनेची प्रकरणे.	अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव

३	विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व इतर मागास प्रवर्ग कल्याण विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील वेतनश्रेणी ४४००-७४४०+ग्रेड पे १६०० या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीतील हवालदार/नाईक/आवेष्टक/झेरॉक्स ऑपरेटर या पदावर शिपाई संवर्गातून पदोन्नतीने करावयाच्या नेमणुका/ पदस्थापनेची प्रकरणे.	अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२२६१८०४३६३८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhaurao
Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.02.26 18:06:08 +05'30'

(भा. र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१) अवर सचिव (कार्यासन १२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२) सचिव (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण) यांचे स्वीय सहायक.
३) सह सचिव (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण) यांचे स्वीय सहायक.
४) सर्व अवर सचिव (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग), मंत्रालय, मुंबई.
५) सर्व कक्ष अधिकारी (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग), मंत्रालय, मुंबई.
६) निवड नस्ती (आस्था-१).

****